इतिहास


चित्रपट वितरक काझी यांच्या मुलीच्या साखरपुड्याच्या पार्टीत कुंदनलाल सायगल यांनी गीत म्हणणं आणि तिथून त्यांचा द न्यू थिएटर्समध्ये प्रवेश होणं या गोष्टी इंडस्ट्रीसाठी फार लाभदायी ठरल्या. मात्र तो निर्णय घेतला तेव्ह कुंदनलालचं काय करायचं? याबद्दल काहीही ठरलेलं नव्हतं. एक चांगला गायक लोकांसमोर यावा असं मात्र आर. सी. बोरालना मनापासून वाटत होतं.

त्यावेळी अभिनेतेच आपल्यावर चित्रीत गाण्यांना आवाजही देत. पण म्हणून सगळ्याच चित्रीत गाण्यांचं रेकॉर्डिंग केलेलं संगीत म्युझिक कंपन्या बाजारात आणत नसत. आणखीही एक अडचण होतीच. हिंदुस्तान रेकॉर्ड कंपनी तत्कालीन प्रसिद्ध गायक-कलाकारांच्या आवाजात दादरा, ठुमरी किंवा गझलसारख्या गायकीच्याच रेकॉर्ड्स बाजारात आणत. अशा परिस्थितीत हा नवखा तरुण कसा टिकाव धरणार होता?

द न्यू थिएटर्सबरोबरच आर. सी. बोराल रेडियोवरही काम करत. रेडियोवर पंकज मलिकही होते. बोरालनी या मुलासाठी रेडियोवर प्रयत्न करायचं ठरवलं. त्यासाठी त्यांनी नृपेन मझुमदार नावाच्या रेडियोच्या एका पदाधिकाऱ्यांची मदत घ्यायचं ठरवलं. रायचंद बोरालांच्या शब्दाखातर नृपेनदा कुंदनलालना बोरालसह पंकजदांकडे घेऊन गेले. तिथे सायगलांची ऑडिशन झाली.

'गुजर गया वह जमाना...' नावाच्या आपल्या आत्मचरित्रात पंकजदांनी या घटनेचा उल्लेख केलाय. ते लिहीतात, 'त्याच्या आवाजात अलौकिक मार्दव आणि पुरुषी दमदारपणा होता. स्वराची पातळी कायम राखत तो कोणत्याही पट्टीत गाऊ शकायचा. याच गुणामुळे पुढे त्याचा आवाज 'सायगलचा आवाज' म्हणून लोकप्रिय झाला. कोणत्याही अभ्यासाशिवाय त्याने सुरांवर मिळवलेली पकड मजबूत होती.'

त्याच दिवशी संध्याकाळी सायगलांच्या आवाजातल्या दोन गझला रेडियोवर प्रसारित झाल्या. आपल्याला गायक म्हणून इतक्या चटकन स्वीकारलं जाईल याची खुद्द सायगलांनीही कल्पना केली नव्हती. द न्यू थिएटर्समध्ये त्याचं पदार्पण झालं आणि *मोहब्बत के आंसू* नावाचा त्यांचा पहिला वहिला सिनेमाही प्रदर्शित झाला. बी. एन. सरकारांच्याच थिएटरमध्ये तो प्रदर्शित झाला. (नंतर ते चित्रा थिएटर या नावाने ओळखलं जाऊ लागलं.) त्यात सायगल नायक होते. अर्थात, पडद्यावर ते नकली वीग लावूनच दिसले. त्या सिनेमाची भाषा शुद्ध हिंदी नव्हती, ऊर्दू होती. प्रेमांकूर अटोर्थींनी त्याचं दिग्दर्शन केलं होतं. त्या सिनेमाच्या गाण्यांविषयी काही माहिती उपलब्ध नाही. त्याची रेकॉर्ड तर तयार



पंकज मलिक

द न्यू थिएटर्सचं पुढचं पाऊल

द न्यू थिएटर्सची स्थापना ही जशी एक महान घटना होती, त्याचप्रमाणे न्यू थिएटर्सने केलेले विविध प्रयोगही महत्त्वपूर्ण होते. गायक-अभिनेता कुंदनलाल सायगलांच्या प्रतिभेची पारख करून त्यांना पहिली संधी न्यू थिएटर्सनीच दिली होती. त्याच न्यू थिएटर्सनी प्रसिद्ध कवि रवींद्रनाथ टागोर यांनाही दिग्दर्शक म्हणून लोकांसमोर आणलं.

□ रजनीकुमार पंड्या

करण्यात आलीच नाही.

द न्यू थिएटर्सच्या *महोब्बत के आंसू*(१९३१), *जिंदा लाश*(१९३२) आणि *सुबह का तारा* अशा तीन तीन सिनेमांचे नायक असूनही कुंदनलाल सायगल यांचं म्हणावं तसं नाव झालेलं नव्हतं. *सुबह का सितारा*मध्ये तर त्यांची दोन गाणीही होती. रायचंद बोरालांच्या संगीतातल्या त्या गाण्यांचे बोल होते, 'न सरुर हूं न खुमार हूं, सुकनू हूं न करार हूं...' आणि 'इल्तजा मालिक से यहा है, इस दिले नाशाद की...' यात प्रसिद्ध गायिका रतनबाई(त्यांचं खरं नाव इमाम बांदी होतं) यांच्याबरोबर सायगलांचं एक युगूलगीतही होतं. पण त्या गाण्यांच्या गायक-गीतकार किंवा संगीतकारांचं फारसं नाव नसल्याने त्यांची रेकॉर्ड बाजारात आली नाही.

गायक म्हणून सायगलांना नावारूपाला आणण्याचं श्रेय द न्यू थिएटर्सपेक्षा हिंदुस्तान रेकॉर्ड कंपनीचे चंडीबाबू ऊर्फ सी. सी. सहा यांना द्यायला हवं. सायगलांच्या चित्रपटगीतांबरोबरच रेडीयोवर प्रसारित होणाऱ्या गझला आणि भजनांमुळे या गायकाप्रती त्यांची रूची वाढली. ग्रामोफोन रेकॉर्डसाठी त्यांनीच सायगलांचं एक गीत सर्वप्रथम रेकॉर्ड केलं. त्या गाण्याचे बोल होते 'झूलना झुलाओ...' ही जुलै १९३२ची गोष्ट. त्या गीताच्या रेकॉर्डच्या मागच्या बाजूसाठी 'होरी हो ब्रजराज दुलारे...' हे आणखी एक गाणं ध्वनीमुद्रीत करण्यात आलं. या दोन गाण्यांसाठी सायगलांना किती मानधन मिळालं माहीतेय? अवघे दोनशे रूपये.(काहींच्या मते, सायगलांना फक्त पन्नास रुपयेच देण्यात आले होते.) इतक्या कमी मानधनात सायगलांनी आपल्या गाण्याचे सगळे हक्क त्या रेकॉर्ड कंपनीला विकले. ही रेकॉर्ड बाजारात आल्याबरोबर तिची झटपट विक्री झाली. लाखो रुपयांचा धंदा झाला.

त्याकाळी अशाप्रकारची बिनफिल्मी गाणी गाणारे गायक म्हणून भाई छैला पतियावाला आणि भाई देसा ऑफ अमृतसर ही दोन नावं प्रामुख्याने आघाडीवर होती. टीपेचा आवाज लावण्यात या दोघांचा हात धरणारं संपूर्ण हिंदुस्तानात कोणी नाही असा त्यांच्या चाहत्यांचा ठाम समज होता. पण सायगलांच्या सौम्य, संथ, मधुर आवाजाने लोकांना वेड लावलं. सायगलांनी बंगाली संगीतच नाही तर समग्र भारतीय सुगम संगीताचा प्रवाहच बदलून टाकला. संगीतातल्या अनेक मान्यतांना वेगळे संदर्भ दिले. आसावरी गंधारमध्ये गाणारा गायक ताकदीचा असेल, तर त्या गाण्याचा प्रभाव जादुई ठरतो हे सायगलांच्या 'झूलना झुलाओ...'ने सिद्ध केलं. तर दुसरीकडे होरीसारख्या पारंपरिक गायनप्रकारात झपतालाचं मिश्रण करून गायलेल्या त्यांच्या 'होरी हो ब्रजराज दुलारे...'सारखं गाणं तर लोकांनी डोक्यावर घेतलं.

सायगल न्यू थिएटर्समध्ये नोकरी करत होते. पण त्यांच्या या यशात न्यू थिएटर्सचा तसा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष काहीही संबंध नव्हता. तरीही रेकॉर्डला मिळालेलं हे अभूतपूर्व यश पाहून स्वतः बी.एन. सरकार चंडीबाबूंना भेटायला गेले आणि त्यांचं अभिनंदन केलं. त्यावेळी चंडीबाबूंनी सरकारांकडे कबुली देत म्हटलं की, गाण्याच्या रेकॉर्ड्सची पाच लाखांपेक्षा जास्त विक्री झालीय आणि त्यासाठी कुंदनलालला देऊ केलेले दोनशे रुपये हे मानधन त्यामानाने फारच शुल्लक वाटतंय. आपण यापुढे त्याची नवी गाणी रेकॉर्ड करण्या आधी त्याच्याशी रॉयल्टीचा रितसर करार करून घेण्याचा विचार करतोय. ही गोष्ट सरकार यांनी सायगलांना सांगितली तेव्हा सायगलांच्या मनात विचार आला, रेकॉर्डची जास्त विक्री झाली म्हणून हे मानधन वाढवून द्यायला तयार झालेत. पण भविष्यात विक्री कमी झाली तर? म्हणून मग सायगलांनी अशाप्रकारचा करार करण्यात फारशी उत्सुकता दाखवली नाही. तरीही सरकार यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी पुढच्या गाण्यांबाबत मौखिक स्वरुपात करार केला आणि ही घटना उभ्या इंडस्ट्रीसाठी अभूतपूर्व ठरली. कारण, त्यामुळे कलाकाराच्या कलेला मिळणाऱ्या प्रतिसादानुसार त्याला त्याचं मानधन मिळायला हवं, हा एक नवा विचार पुढे आला. इतकंच नाही तर रुजलाही. आजही चित्रपट गायनच नाही तर इतरही नॉन फिल्मी गाण्यांचं व्यावसायिक तत्त्वावर रेकॉर्डिंग होताना ही गोष्ट विचारात घेतली जाते. आजही अनेक कलाकार ठरलेल्या मानधनाच्या रकमेबरोबरच हिट गाण्यांच्या नफ्याचाही लाभ मिळवताना दिसतात.


सायगलांच्या या अनपेक्षित आणि अफाट लोकप्रियतेचा फायदा पुढे अनेक वर्ष द न्यू थिएटर्सला झाला हे काही नव्याने सांगायला



*जिंदा लाश*मध्ये पांढऱ्या दाढीतले सायगल


नको. १९३२ ते ३४ या दोन वर्षांच्या काळात द न्यू थिएटर्सने बंगाली भाषेत *चंडीदास*ची निर्मिती केली. दुर्गादास बॅनर्जी त्याचे नायक होते. के.सी.डेंची गाणी आणि एका छोट्याशा भूमिकेत ते स्वतःही होते. उमाशशीही होते. पण त्या सिनेमाला फारशी लोकप्रियता मिळाली नाही. त्यानंतर द न्यू थिएटर्सने *डॉ. टागोर्स रिप्लाय* नावाचं एक अगदी छोटसं वृत्तचित्र तयार केलं. त्याच काळात शांतिनिकेतनच्या विद्यार्थ्यांना कलाकार म्हणून घेऊन *नटीर पूजा* नावाचा एक चित्रपटही बनवला. अर्थात बंगालीत. गमतीची गोष्ट अशी की, त्या सिनेमाचं दिग्दर्शन कविवर्य टागोर यांनीच केलं होतं. संगीत दिनेन्द्रनाथ टागोर यांचं होतं. स्टार सिनेमा नावाच्या चित्रपटगृहात बंगाली सिनेमा रिलीज होत असत. १२ मार्च १९३२ रोजी तो सिनेमा स्टारमध्ये रिलीज झाला. याच सिनेमात आपल्या सत्तराव्या वाढदिवसाच्या दिवशी द न्यू थिएटर्ससारख्या साहित्यप्रेमी संस्थांना टागोर यांनी दिलेल्या


संदेशाचाही समावेश करण्यात आला होता. बी.एन. सरकार टागोरभक्त होते. *नटीर पूजा*च्या शूटिंगदरम्यान दिग्दर्शक म्हणून स्टुडियोत येणाऱ्या कविवर्य टागोर यांच्या तात्पुरत्या वास्तव्यासाठी शांतीनिकेतनसारखी एक छोटीशी कुटीरही बांधण्यात आली होती. तिचं नामकरण 'गोल घर' असं करण्यात आलं होतं. *नटीर पूजा*ला लोकांचा चांगला प्रतिसाद लाभला. त्याकाळी पाच हजार ही अफ़ाट रक्कम समजली जात असे. द न्यू थिएटर्सने ही रक्कम शांतिनिकेतन (विश्वभारती)ला आर्थिक मदत म्हणून दिली होती. कविवर्य टागोरांची कथा आणि त्यांच्याच दिग्दर्शनात तयार झालेली ही अप्रतिम, अलौकिक कलाकृती १९४० साली द न्यू थिएटर्सला लागलेल्या आगीत जळून खाक झाली. या सिनेमाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, सत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्ताने ओल्ड एम्पायर ऑडिटोरियममध्ये सादर करण्यात आलेल्या याच नावाच्या नृत्यनाटिकेचा समावेशही त्यात करण्यात आला होता. त्या दृष्टीनेही तो सिनेमा फार मौल्यवान होता.


कवि रवींद्रनाथ टागोर

नवे नवे प्रयोग करणं आणि नवे प्रवाह रुढ करण्याबाबत न्यू थिएटर्स निव्वळ बंगाली संस्कृतीच नाही तर संपूर्ण भारतीय परंपरेशी आपली बांधिलकी मानत होतं. *नटीर पूजा*मध्ये त्या नृत्यनाटिकेचं चित्रीकरण, चंडीदास(बंगाली)त पहिल्यांदा पार्श्वसंगीताचा उपयोग असे कितीतरी प्रयोग न्यू थिएटर्सने केले. शैली आणि चित्रपट निर्मिती तंत्र याबाबतीत तर बंगाली *चंडीदास* हा उत्कृष्ट नमुना होताच, पण कथेतील संवेदनशील दृश्यांना परिणामकारक खोली प्राप्त करून देण्यासाठी पार्श्वसंगीताचा वापर हाही चित्रपट जगतातला मैलाचा दगड ठरावा अशी घटना होती. एखाद्या गाण्यासाठी पार्श्वगायन ठीक होतं, पण अशाप्रकारे दृश्यासाठी पार्श्वसंगीत देता येतं हा विचार आर. सी. बोराल यांच्या सृजनशील प्रतिभेचा मोठा पुरावा होता.

१९३२मध्ये प्रसिद्ध बंगाली नाटककार द्विजेन्द्रलाल रॉय यांच्या *पुनर्जन्म* या नाटकावर आधारित त्याच शीर्षकाचा बंगाली चित्रपट प्रेमांकुर अटोर्थी यांच्या दिग्दर्शनात प्रदर्शित झाला. त्याचं वैशिष्ट्य असं की कृष्ण हालदार हे टोपण नाव धारण करून प्रेमांकुरांनी त्यात एक भूमिकाही साकारली. साहित्यकृतींवर आधारित सिनेमे बनवण्याचा हा सिलसिला कविवर्य टागोर यांच्या 'चिरकुमार सभा' नावाच्या कथेवर त्याच शीर्षकाचा सिनेमा बनवून पुढेही चालूच होता. अर्थात बंगालीतच. शरदबाबूंच्या 'पल्ली समाज'वर आधारित द न्यू थिएटर्सचा सिनेमा याच मालिकेतलं पुढचं पाऊल होतं.


देवकी बोस


नीतिन बोस

शिशिरकुमार भादुडीसारख्या आघाडीच्या नाटककारांनी त्याची पटकथा लिहीली, दिग्दर्शन केलं आणि स्वतः त्यात अभिनयही केला. आजचे संगीतकार भप्पी लाहिरी यांचे पिता अमलेन्दु लाहिरी यांनीही त्यात एक भूमिका साकारली होती. त्या सिनेमाची गाणी फारही चालली नाही. शिवाय चित्रपट गीतांच्या रेकॉर्ड्स काढायची पद्धत अजूनही सुरू झालेली नव्हती. त्यामुळे ती गाणी काळाच्या पडद्याआड गेली.

१६ जानेवारी १९३२ रोजी सायगल यांची भूमिका असलेला *जिंदा लाश* नावाचा एक हिंदी-ऊर्दू सिनेमा अलाहाबादच्या विश्वंभर टॉकिजमध्ये प्रदर्शित झाला. त्यानंतर तर द न्यू थिएटर्सनी दर्जेदार लोकप्रिय साहित्यकृतींवर आधारित चित्रपट बनवण्याचा सपाटाच लावला. सहा बंगाली आणि तीन हिंदी चलचित्रांची निर्मिती केली. त्यातल्या *जोशे मोहब्बत* या शेवटच्या हिंदी सिनेमाची लांबी ९५०५ फूट इतकी असल्याने त्याला *डॉ. टागोर्स रिप्लाय* नावाची एक फूटाची लघुचित्राची जोड लावावी लागली. बी.एन. सरकार यांच्या मालकीच्या चित्रा टॉकीजमध्येच हे सिनेमे प्रदर्शित झाले होते. *जोशे मोहब्बत*चे कलाकार, संगीत, कॅमेरामन वगैरेविषयी काहीही माहिती उपलब्ध नाही. पण त्यात सायगल यांनी एक महत्त्वपूर्ण भूमिका साकारली होती, असं जाणकारांचं मत आहे. त्यात सायगल यांनी दोन गीतंही गायली होती पण त्यांचं रेकॉर्डिंग न झाल्यामुळे त्यावेळी सायगल यांची ओळख 'झूलना झुला...'चा गायक म्हणूनच झाली. द न्यू थिएटर्सच्या संगीत टीमचे सदस्य म्हणून नव्हे तर न्यू थिएटर्सची एक महत्त्वाची व्यक्ती म्हणूनच ओळखले जात होते. त्या टीममध्ये आर.सी. बोराल(संगीत), प्रेमांकुर अटोर्थी(दिग्दर्शक), नीतिन बोस(कॅमेरा), मुकूल बोस(ध्वनी), देवकी बोस(पटकथा आणि कलादिग्दर्शक) यांचीच नावं प्रामुख्याने घेतली जात होती.

पंकज मलिक रायचंद बोराल यांचे *देना पावना*पासूनचे सहकारी असूनही त्यांचं नाव नेहमीच क्रेडिट टायटल्समध्ये सगळ्यात शेवटी अगदी बारीक अक्षरांत असायचं. त्यामुळे या गुणी आणि प्रतिभावंत संगीतकार-गायकाचाही फारसा उल्लेख होत नसे.

(क्रमशः)